# दस्त नोदंणीस स्वीकाणे तसेच कबुलीजबाब नोदंविणेसाठी गृहभेट

## Attending home for acceptance & admission of document for registration

### विषय ओळख About

दस्त नोदंणीस सादर करणे तसेच दस्तात केलेल्या निष्पादनाचा कबुलीजबाब देणे, याकारीता दुय्यम निबंधक यांचे कार्यालयात उपस्थीत रहाणे आवश्यक असते. परंतु काही शारीरीक असमर्थतेमुळे पक्षकार जर दुय्यम निबंधक कार्यालयात उपस्थीत राहू शकत नसल्यास, ते त्यांचा दस्त नोदंणीस सादर करणे किंवा कबुलीजबाब नोदंविण्यासाठी त्यांचे राहत्या ठिकाणी येणेबाबत दुय्यम निबंधकास विनंती अर्ज करु शकतात. अर्जासोबत तसा सबळ पुरावा जोडणे आवश्यक असते.

अशा अर्जातील नमूद कारणांबाबत दुय्यम निबंधक यांचे समाधान झाल्यास, ते अशी गृहभेट स्वीकारु शकतात व ठरविलेल्या वेळी व अर्जात नमुद पत्त्यावर दुय्यम निबंधक जाउन गृहभेटीची प्रक्रीया पार पाडतात. जून 2013 पासुन, अशा गृहभेटीचे चित्रीकरण करण्यात येत असून, त्याचा सर्व खर्च अर्जदाराने स्वत:हुन करायचा आहे तसेच चित्रीकरणाची सीडी दुय्यम निबंधक कार्यालयात सादर करायची आहे.